खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड, जि. पुणे

## राज्यशास्त्र विभाग

दि.२६ नोव्हेंबर २०२२

## अहवाल

## “२६ नोव्हेंबर संविधान गौरव दिन”

दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयामध्ये दि.२६ नोव्हेंबर २०२२ रोजी मोठ्या उत्साहामध्ये “संविधान गौरव दिन” साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘जागर संविधानाचा’ या विषयावर संविधानाचे महत्त्व व संविधानाची ओळख महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्हावी, या हेतूने पथनाट्य महाविद्यालयामध्ये सादर करण्यात आले. तसेच रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तिपत्रक प्रदर्शनी व संविधान वाचन या कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहाने आयोजन करण्यात आले. यावेळेस विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले गेले. तसेच संविधान विषयक रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रक प्रदर्शनी इत्यादींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधाना प्रति जागरूकता निर्माण करण्यात आली. वरील स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला तर महाविद्यालयातील एकूण ८५ विद्यार्थ्यांनी सामूहिक पद्धतीने संविधान उद्देशिका वाचन केली. यावेळेस खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर,

साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम. जरे इ. उपस्थीत होते. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वर्गाचे सहकार्य सदर कार्यक्रम पार पाडण्यास लाभले.

प्रा.एस.एल.बुरुड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

डॉ.एच.एम.जरे
प्राचार्य

# कार्यक्रमाचे फोटो






भारतीय संविधान दिनाच्या हार्दिक शुभेच्छा


संविधान गौरव दिन
Justice
Liberty
Equality
Fraternity




साहेबरावजी बुटेपाटील महाविद्यालय
कला, वाणिज्य व विज्ञान
आपले सहर्ष स्वागत करीत आहोत!
SBM